## GLIMPSES OF THE PROGRAMS



**Padmashri Dr. Vitthhalrao Vikhe Patil Birth Anniversary**




**On the Occasion of Rajiv Gandhi's Birth Anniversary an oath was taken**




**Mahatma Gandhi and Lalbahadur Shastri;s Birth Anniverasary**




**Mahatma Jyotirao Phule's Death Anniversary**



**On the occasion of Sardar Vallabhbhai Patel's Death Anniversary an oath was taken**



**Savitribai Phule Birth Anniversary**




**Swami Vivekanand and Rajmata Jijau's Birth Anniversary**



**Mahatma Gandhi's Death Anniversary-Hutatma Diwas**



**Chhatrapati shivaji Maharaj Birth Anniversary**




**Mahatma Jyotirao Phule Birth Anniversary**




**Padmashri Dr. Vitthhalrao Vikhe Patil Death Anniversary**




**Dr. Balasaheb Vikhe patil Birth Anniversary**

# SOME GLIMPSES OF ONLINE PROGRAMS












## PUBLICITY IN NEWSPAPERS OF ONLINE PROGRAMS

नगर दर्शन

मंगळवार ,दि२७ एप्रिल २०२१

# ग्रामीण भागात शैक्षणिक क्रांती करणारे विखे क्रांतिवीर-डॉ.नवले

दै.नगरदर्शन/सात्रळ

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी ग्रामीण भागात आर्थिक परिवर्तन घडविताना कष्टकरी समाजाच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. ग्रामीण भागात शैक्षणिक क्रांती करणारी ते खरे क्रांतिवीर होते. पद्मश्रींनी समाज परिवर्तन घडविताना सहकार तत्वज्ञानाची पेरणी केल्याचे मत प्रतिपादन सात्रळ येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे हिंदी विभागप्रमुख प्रा.डॉ. भाऊसाहेब नवनाथ नवले यांनी केले.



लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील ( पद्मभूषण उपाधिने सन्मानित) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ येथे उत्सव समिती आयोजित सहकारी साखर कारखानदारीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या ४१ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित

ऑनलाईन व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ. सोमनाथ घोलप होते.

प्रास्ताविक उत्सव समितीचे समन्वयक प्रो. डॉ. शिवाजी पंडित यांनी केले.

यावेळी प्राचार्य प्रो.डॉ. सोमनाथ घोलप, उपप्राचार्य प्रा. दीपक घोलप, कार्यालयीन अधिक्षक श्री. विलास शिंदे, श्री. महेंद्र तांबे, प्रा. विकास दिघे, प्रा. वैभव दिघे, प्रा. विनोद पलघडमल,श्री. बी.डी. विखे, श्री. सुखदेव पवार यांनी महाविद्यालयात उपस्थित राहून पद्मश्रींच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

डॉ. नवले पुढे म्हणाले, पद्मश्री बहुजनांचे समर्थक होते. पद्मश्री स्वतः शेतकरी असल्याने शेतकऱ्यांचे दुःख आणि वेदना त्यांनी जवळून अनुभवल्या होत्या.आर्थिक स्थिरता लाभल्याशिवाय ग्रामीण भागाचे प्रश्न सुटूच शकत नाहीत. हे त्यांनी वेळीच ओळखले.सहकारी चळवळीचा जन्म हा विखे पाटील यांच्या जन्माबरोबरच झाला असे म्हणावे लागेल.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य प्रो. डॉ. सोमनाथ घोलप म्हणाले, पद्मश्रींचे व्यक्तिमत्त्व अनंत पैलूंचे आहे. पद्मश्रींनी आधुनिक ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण एकात्मिक विकासाचे मॉडेल उभा करून भारतात कृषी औद्योगिक क्रांतीचा पाया घातला. शेती,सहकार,शिक्षण व उद्योग या क्षेत्रात नवनवीन परंपरा निर्माण करणारे पद्मश्री एक असामान्य आणि अलौकिक सहकार महर्षी होते.

कार्यक्रमाचे आभार सहयोगी प्राध्यापक व वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. रामदास बोरसे यांनी मानले. महाविद्यालयाने आयोजित केलेल्या ऑनलाईन व्याख्यानास विद्यार्थी - विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला.

---

रविवार , दि ११ एप्रिल २०२१

# महात्मा ज़ोतीराव फुले यांच्या विचारसरणीमुळे बहुजनांचा आत्मसन्मान जागृत - डॉ.कासार

दै.नगरदर्शन /सात्रळ

भारतीय विचार परंपरेची जे विविध विचारवंत होऊन गेले त्यामध्ये जोतीराव गोविंदराव फुले हे कृतिशील विचारवंत म्हणून ओळखले जातात. एकोणिसाव्या शतकात त्यांची क्रांतिदर्शी व्यक्तित्व आणि कर्तृत्व होऊन गेले. शेतकऱ्याचा असूड हा ग्रंथ आधुनिक भूमिपुत्र जोतीराव फुले यांच्या शेती व शेतकरी विषयक चिंतनाचा प्रमाणभूत आविष्कार आहे. फुले यांच्या तर्कशुद्ध विचारसरणीमुळे बहुजनांचा आत्मसन्मान जागृत झाल्याचे मत प्रतिपादन राहाता येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागप्रमुख डॉ. रोहिणी कासार यांनी केले.

लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील ( पद्मभूषण उपाधिने सन्मानित) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला, वाणिज्य व समाजक्रांतीचे जनक, आधुनिक भूमिपुत्र महात्मा जोतीराव



महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य प्रो. डॉ. सोमनाथ घोलप. समवेत कार्यालयीन अधिक्षक श्री. विलास शिंदे, श्री. सुखदेव पवार, प्रा. विकास दिघे, प्रा. वैभव दिघे, प्रा. विनोद पलघडमल.

गोविंदराव फुले यांच्या १९४ व्या जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन व्याख्यानात त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ. सोमनाथ प्राचार्य प्रो.डॉ. सोमनाथ घोलप, कार्यालयीन अधिक्षक श्री. विलास शिंदे, श्री. सुखदेव पवार, प्रा. विकास दिघे, प्रा. वैभव दिघे, प्रा. विनोद पलघडमल यांनी महाविद्यालयात उपस्थित राहून फुलेंच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

महात्मा फुलेंनी राबविलेल्या

भाषणात प्राचार्य प्रो. डॉ. सोमनाथ घोलप म्हणाले, जोतीराव फुले यांचे व्यक्तिमत्त्व अनंत पैलूंचे आहे. त्यांनी समाज,संस्कृती,धर्म,शिक्षण, साहित्य या विविध क्षेत्राबरोबरच कृषी क्षेत्रात मूलभूत कार्य केले. तसेच भारतीय शेती व शेतकरी यांच्या उन्नयनासाठी लेखन करून चळवळ उभारली. आधुनिक भूमिपुत्र जोतीराव फुले यांचे नवभारत निर्मितीचे कार्य गौरवास्पद आहे. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्यशोधक जोतीराव फुले यांना आपले गुरू मानले. फुले हे कृतिशील समाजसुधारक, विचारवंत,तत्त्वज्ञ होते.

कार्यक्रमाचे आभार उत्सव समितीचे समन्वयक प्रो. डॉ. शिवाजी पंडित यांनी मानले. महाविद्यालयाने आयोजित केलेल्या ऑनलाईन व्याख्यानास विद्यार्थी - विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त